**GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI**
(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 &
Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)
विद्यार्थी विकास विभाग

डॉ.शैलेंद्र देव
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
मो.नं ९८६०२११७५७

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : dsd.gug123@ gmail.com

पत्र क्र. No.GU/DSD / 1819/2021 दिनांक २३/०८/२०२१

प्रति,

मा.प्राचार्य,
विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

विषय:— ऑनलाईन युवा महोत्सवात विद्यार्थी सहभागाबाबत.

संदर्भ:— संदर्भ:— जावक/पुआहोसोविसो/विद्यार्थी विकास/२०२०—२१/५९४१ दिनांक १३/०८/२०२१

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा सन २०२०—२१ या वर्षातील युवा महोत्सव(उन्मेष सृजनरंगाचा) दिनांक ०६ ते ०८ सप्टेंबर, २०२१ दरम्यान खालीलप्रमाणे विविध महाविद्यालयात ऑनलाईन पार पडणार आहे.

| यजमान महाविद्यालयाचे नाव | कलाप्रकाराचे नाव |
|---|---|
| ललीत कला व कला संकुल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ | संगीत |
| संगमेश्वर महाविद्यालय सोलापूर | ललीत वैयक्तीक सर्व कलाप्रकार |
| डि.एच.बी.सोनी कॉलेज सोलापूर | शास्त्रीय नृत्य |
| देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ | नकला |
| वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर | वक्तृत्व मराठी, हिंदी, इंग्रजी, वादविवाद |

उपरोक्त ऑनलाईन युवा महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा. व ज्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वरील युवा महोत्सवामध्ये सहभाग घेतला असेल त्यांची माहिती विद्यार्थी विकास विभागास तातडीने कळवावी.

धन्यवाद!

(डॉ. शैलेंद्र देव)
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University,Solapur
केगाव सोलापूर
ईपीएबीएक्स ०२१७ -२७४४७७८ (११ लाईन्स) विस्तृत क्र २२५ फॅक्स-०२१७-२७४४७७०
: http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in Email; dsw@sus.ac.in
NAAC Accredited 2015 'B' Grade (CGPA -2.62)
विद्यार्थी विकास विभाग/Department of Student Development

जावक्र पुआहोसोविसो/विद्यार्थी विकास/२०२०-२१/5941

दि. 13 AUG 202

प्रति,

**मा. प्राचार्य,**
सर्व संलग्न महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

विषय:- ऑन लाईन युवा महोत्सवात विद्यार्थी सहभागाबाबत...

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, प्रस्तूत विद्यापीठाचा सन २०२०-२१ या वर्षातील युवा महोत्सव (उन्मेष सृजनरंगाचा) दि.०६ ते ०८ सप्टेबर २०२१ दरम्यान खालील प्रमाणे विविध महाविद्यालयात ऑनलाईन पार पडणार आहे.

| यजमान महाविद्यालयाचे नाव | कलाप्रकाराचे नाव |
|---|---|
| ललीत कला व कला संकुल<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ | संगित |
| संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर | ललीत वैयक्तीक सर्व कलाप्रकार |
| डि. एच. बी. सोनी कॉलेज सोलापूर | शास्त्रीय नृत्य |
| देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ | नकला |
| वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर | वक्तृत्व मराठी, हिंदी, इंग्रजी, वादविवाद. |

युवा महोत्सवात सोबत जोडलेल्या यादी प्रमाणेच विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. त्यास अनुसरून खालील सुचनांचे महाविद्यालयांनी पालन करावे.

१ ऑनलाईन युवा महोत्सवाच्या २०२०-२१ आयोजनाच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली नियमावली विद्यापीठाचे संकेतस्थळ sus.ac.in व http://su.digitaluniversity.ac वर उपलब्ध आहे. त्याचे एकदम बारकाईने निरीक्षण व पालन करावे.

२ युवा महोत्सवात सहभागी होणा-या कलाकरांसाठी विद्यापीठाकडून ऑनलाईन गुगलफॉर्म भरून देण्याची व्यवस्था करण्यात आली असून त्याची लिंक खालील प्रमाणे आहे. लिंकबाबत काही आडचण आल्यास डॉ एस डी राऊत ८६०५१४०८१५ या क्रमांकावर संपर्क करावा.

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSdejXzlL3trhclGrXuFIFSp2HwDPJRyTIsearR6I70XwdunGg/formResponse

| | |
|---|---|
| ३ | फक्त १८ सहभागी विद्यार्थ्यांच्या २ संघव्यवस्थापक तसेच ३ व्यवसायिक साथीदार असे एकुण २० कलाकारांच्या प्रवेशिका यादी व सोबत जोडल्याप्रमाणे सोबतच्या लिंकवर जाऊन ऑनलाईन सर्व बाबी भराव्यात. |
| ४ | महोत्सवात कला प्रकाराच्या प्रवेशासांठी सांघीक फी रू १००/- व वैयक्तीक फी रू ५०/- इतकी ठेवण्यात आली आहे. तरे दि.३१/०८/२०२१ पर्यंत विद्यार्थ्यांच्या प्रवेशिका ऑनलाईन भरून घ्याव्यात.त्यानंत आलेल्या प्रवेशिका स्विकारल्या जाणार नाहीत |
| ५ | महोत्सवात सहभागी कलाकाराच्या प्रवेशिकांची नोंदनी करताना संघव्यवस्थापकांनी दहावी बोर्ड मुळ प्रमाणपत्र सादर करण अनिवार्य आहे. अपुर्ण असलेल्या प्रवेशिका नाकारण्याचा अधिकार यजमान महाविद्यालयास राहील. |
| ६ | युवा महोत्सवात ऑनलाईन सादरीकरणाच्या अनुषंगाने सोबत जोडल्याप्रमाणे आपणास संघव्यवस्थापक व विद्यार्थ्यांसाठ नियमावली पाठविली आहे. सदर नियमालीनुसारच सहभाग नोदवावा. |
| ७ | मा. कुलगुरू महोदय आणि युवा महोत्सव समितीने घेतलेल्या निर्णयानुसार निकालाबाबत आक्षेप घेणे, बक्षीस वितरणाव बहिष्कार टाकणे किंवा युवा महोत्सवास गालबोट लावणारे प्रयत्न करणे हा प्रकार अत्यंत गंभीर स्वरूपाचा असून, संघाकडून असे वर्तन घडल्यास या बाबत कडक धोरण अवलंबण्याच्या दृष्टीने अशा महाविद्यालयांच्या संघावर कायम स्वरूपी बंदी घालण्यात येईल. |

उपरोक्त सुचनांचे तंतोतंत पालन करण्याबाबत योग्य त्या सुचना आपल्याकडून संघव्यवस्थापक, विद्यार्थ्यांना द्याव्यात व आपल्या विद्यापीठाचा ऑनलाईन युवा महोत्सव २०२०-२१ यशस्वीपणे पार पाडण्यास सहकार्य करावे.

कळावे.

आपला स्नेहांकीत,

[डॉ. प्रसंत कोरे]
संचालक
विद्यार्थी विकास

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

विद्यार्थी विकास विभाग

१७ वा युवा महोत्सव (Online)

## स्पर्धक विद्यार्थ्यांना सुचना

| | |
|---|---|
| १ | आपली तब्येत आरोग्य व्यवस्थित असल्याची खात्री करून घ्यावी. तब्येत ठीक नसेल तर सादरीकरणाचा विपरीत परिणाम आपल्या आरोग्यावर होणार नाही याची काळजी घ्यावी. |
| २ | सादरीकरणासाठी आवश्यक असणारी इंटरनेट कनेक्टिव्हिटी पूर्णवेळ व्यवस्थित असेल याची खात्री करून घ्यावी. |
| ३ | दिलेल्या वेळेपूर्वी कमीत कमी १५ मिनिटे उपस्थिती असावी. |
| ४ | ऑनलाइन मिटींगला जॉईन झाल्या झाल्या आपल्या नावात बदल करून (rename yourself) साजरी करण्यासाठी आपल्याला दिलेल्या महाविद्यालय फोड क्रमांकाची नोंद करावी. |
| ५ | स्पर्धकांने आपल्या सादरीकरणाच्या वेळीच माइक व व्हिडिओ सुरु ठेवावा. |
| ६ | सादरी करण्यासाठी आपण आपल्या सोयीनुसार योग्य जागेची निवड करावी व त्या ठिकाणी सादरीकरणाचा सराव करून घ्यावा. सादरीकरणामध्ये इतर गोष्टींचा व्यत्यय येणार व्यक्ती येणार नाही अशा स्वच्छ, नीटनेटकी , शांत जागा निवडावी. |
| ७ | आपला पोशाख व्यवस्थित असावा तसेच कॅमेरासमोर आपली हालचाल अवश्यक तेवढीच असावी. अवश्यक वाटल्यास व्हर्च्यूअल बॅकग्राऊंड चा वापर करावा. |
| ८ | एकदा मीटिंग जॉईन केल्यानंतर इतर कामे करू नये. |
| ९ | सादरीकरणासाठी शक्यतो लॅपटॉप / डेस्कटॉप संगणक वापरावा अशावेळी आपला फोन शक्यतो दूर ठेवावा |
| १० | सादरीकरणासाठी अवश्यकतेनुरार हेडफोनचा वापर करावा. |
| ११ | सादरीकरणासाठी कॅमे-याचा वाईड अँगल लॅडस्केप करावा  कॅमे-याची जागा निश्चित फिक्स असावी. |
| १२ | आवश्यकतेनुसार ध्वनी, प्रकाश यंत्रणा तयार असावी |
| १३ | कला विभागातील फाईन आर्ट च्या सर्व स्पर्धासाठी टॉप अँगलने कॅमेरा सेटप करणे जेणेकरून स्पर्धक विद्यार्थ्यासह कलानिर्मिती करताना परीक्षक देखरेख करून नोंद घेऊ शकतील. |
| १३ | सादरीकरणासाठी साथीदार वापरणार असाल तर त्याची माईक व्यवस्था आधीच सेट करून घेणे. |

| | |
|---|---|
| १४ | सर्व स्पर्धाचे आणि सादरीकरणाचे व्हिडिओ रेकॉर्डिंग होणार आहे त्यामुळे स्पर्धेमध्ये कोणताही गैरप्रकार अथवा प्रमाद होणार नाही याची काळजी स्पर्धका विद्यार्थ्यांनी घ्यावी.जर तसे निदर्शनास आल्यास स्पर्धक विद्यार्थी स्पर्धेतून बाद ठरविला जाईल. |
| १५ | बेकायदेशीर नोंदणी, प्रवेश व सादरीकरण याबाबत काही तक्रार उद्भवल्यास संबंधित विद्यार्थी संघप्रमुख तसेच महाविद्यालयास जबाबदार धरले जाईल व त्याच्यावर विद्यापीठ नियमानुसार कारवाई केली जाईल. |
| १६ | सादरीकरणादरम्यान काही अडचण आल्यास विद्यार्थ्यांनी घाबरून जाऊ नये.संघप्रमुखाच्या व आयोजकांच्या संपर्कात रहावे. |
| १७ | विद्यार्थ्यांना दिलेली लिंक मित्रांना शेअर करू नये. |
| १८ | फाईन आर्टच्या कलाप्रकारांमध्ये सहभागी स्पर्धकांनी आपली कलाकृती पूर्ण झाल्यावर कोड कोड नंबर रा संपूर्ण कलाकृती दिसेल अशा पद्धतीने कॅमेरा ची व्यवस्था करावी त्यानंतर कोड नंबर सह संपूर्ण कलाकृतीच एकच चांगला फोटो आपणाला दिलेल्या ई-मेल वर आयोजक महाविद्यालयाकडे पाठवावा. |

संचालक
विद्यार्थी विकास विभाग
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विद्यार्थी विकास विभाग

१७ वा युवा महोत्सव (Online)

## संघ प्रमुखांना सुचना

| | |
|---|---|
| १ | संघप्रमुखाने आपल्या महाविद्यालयाच्या स्पर्धक विद्यार्थ्यांच्या सतत संपर्कात राहावे. व त्याकरीता यजमान महाविद्यालयाने तयार कलेल्या Whatsapp Group मध्ये सामिल व्हावे व त्यावरील वेळोवेळी होणा या सुचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. |
| २ | आपल्या महाविद्यालयाच्या स्पर्धकांची नोंदणी हि नियमानुसार आहे याची खात्री करून घ्याव घ्यावी. बेकायदेशीर नोंदणी प्रवेश किंवा सादरीकणाबाबत संबंधित विद्यार्थी, संघप्रमुख तसेच महाविद्यालयास जबाबदार धरले जाईल. |
| ३ | आपले स्पर्धक दिलेल्या लिंकवर वेळेआधी सहभागी होतील याची काळजी प्रमुखांनी घ्यावी. |
| ४ | स्पर्धेपूर्वी विद्यार्थ्यांची ऑनलाईन मीटिंग घेऊन पूर्व सूचना द्याव्यात तसेच त्यांच्या अडचणी समजून घेऊन योग्य त्या उपाययोजना कराव्यात.सर्व विद्यार्थ्यांच्या Whatsapp Group करून त्यांना स्पर्धसंबंधित योग्यत्या सुचना द्याव्यात. |
| ५ | स्पर्धेच्या वेळी आपणही आवश्यकतेनुसार दिलेल्या लिंकवर सहभागी व्हावे. स्पर्धेची लिंक इतरांना शेअर करू नये |
| ६ | स्पर्धा सुरू असताना आपल्याकडून कोणत्याही प्रकारचा अडथळा येऊ नये याची काळजी घ्यावी. आवश्यकता भासल्यास संयोजकाची व्हाट्सअप वर फोनवर चर्चा करून संपर्क साधावा. |
| ७ | स्पर्धेच्या वेळी आपण ऑनलाइन उपस्थित राहणार असल्यास आपला पोशाख व्यवस्थित असावा. आपल्या उपस्थितांच्या वेळी आपला माईक बंद असावा. व्हिडीओ शक्यतो सुरू करू नये. एकाच वेळी अनेक कामे करणे टाळावे. |

संचालक
विद्यार्थी विकास विभाग
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

NAAC Accredited-2015
B Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ



## विद्यार्थी विकास विभाग

## उन्मेष सृजनरंगांचा

### नियमावली पुस्तिका



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ
।। विद्यया संपन्नता ।।

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

ज्ञानरूप देव धर्म जीवनी असो
करूणेचा अमृतघन या मनी वसो ।।धृ ।।

अध्ययनसमृध्द होऊ ध्यास धरोनी
श्रमसंस्कृति वाढवू या यत्न करोनी
ज्ञानकला विज्ञान ध्वजा ही अंबरी विलसो ।।१ ।।

धर्म जाति पंथभेद जाऊ विसरूनी
पतितांना कवळू या धीर देऊनी
अश्रूंना हसवू ही आस नित ठसो ।।२ ।।

सानथोर उच्चनीच ही सरो निशा
ज्ञानसूर्य उगवूनिया उजळु दे दिशा
प्रगतीचा पथ सात्विक लोचनि दिसो ।।३ ।।

दत्ता हलसगीकर

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

## विद्यार्थी विकास विभाग

युवा महोत्सव

'उन्मेष-सृजनरंगांचा'

## नियमावली पुस्तिका

# प्रतिज्ञा

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील आम्ही सर्व विद्यार्थी - विद्यार्थीनींनी या युवा महोत्सवामध्ये भारतीय कलेचा वारसा घेऊन स्वत:च्या कला गुणांचा विकास साधण्यासाठी सहभागी होत आहोत. आमचा सहभाग उत्कर्षमय, आनंदमय ठरवण्यासाठी भारतीय परंपरेतील वैचारिक सामंजस्य, सहिष्णुता आम्ही आमच्या अंगी बाळगून हा युवा महोत्सव आनंदमय करु. जाती - धर्मापलीकडील सामुहिक सहजीवन, दुर्बलांची जाण, वैचारिक अधिष्ठान, त्यागभावना आणि प्रसंगी न्याय भूमिकेसाठी संघर्ष करण्याची तयारी यातूनच राष्ट्र निर्माण होत असते, याची आम्हास जाणीव आहे. आमच्या उदात्त, उदारमतवादी मूल्य परंपरेला साक्षी ठेवून बुद्धिनिष्ठ आणि विवेकनिष्ठ जीवन जगण्यासाठी कटीबद्धहोणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. या युवा महोत्सवातून उपरोक्त सर्व बाबी आमच्या मध्ये विकसित व्हाव्या यासाठी हा युवक महोत्सव संपूर्णत: शांततेत आणि आनंदात पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रतिज्ञा करीत आहोत. आम्ही अशीही प्रतिज्ञा करत आहोत की सर्व कलाप्रकाराच्या माध्यमातून कणखर मनुष्य व बलशाही भारत निर्माण करण्यासाठी प्रयत्न करु, जय हिंद.

'उन्मेष-सृजनरंगांचा'

# मनोगत

प्रिय युवक - युवतींनो,

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या पहिल्या ऑनलाईन युवा महोत्सवामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व कलाकारांचे मन:पूर्वक स्वागत करत असताना मनस्वी आनंद होत आहे. आनंद यासाठी की, कमी कालावधीमध्ये विद्यापीठ सर्वच क्षेत्रामध्ये आपला वेगळा ठसा उमटविण्याचा प्रयत्न करीत आहे. विद्यापीठाची वाटचाल यशस्वीपणे होत असताना सांस्कृतिक क्षेत्रात तर सलग दहा वर्षापेक्षा राष्ट्रीय पातळीवर उत्तुंग झेप घेत आपले अस्तित्व दाखवून दिले आहे. म्हणजे रखरखीत वाळवंटात उभे राहून, धगधगीतपणा सोसूनही फुलून येण्याची ताकद गुलमोहरात जशी असते, तसेच अनेक अडथळ्यांची शर्यत पार करुन कलेमध्ये आपला दबदबा निर्माण करणारे आपले कलाकार कुठे ही कमी नाहीत हे अभिमानाने सांगावेसे वाटते.

सोलापूर ही हुतात्म्यांची व सिद्धरामेश्वरांची पावन भूमी आहे, त्याचबरोबर कलावंताची भूमी आहे. हे विसरुन चालणार नाही. साहित्य, संगीत, नाट्य , शिल्प, ललितकला व चित्रपट क्षेत्रातही सोलापूरच्या सुपुत्रांनी आपला ठसा उमटविला आहे. नवीन कलाकारांसाठी एक वाट तयार केली आहे. हेच लक्ष्य समोर ठेवून विद्यापीठातील विद्यार्थी - विद्यार्थीनी कलेच्या क्षेत्रामध्ये आपले अस्तित्व दाखवून देत आहेत.

आपल्या विद्यापीठाच्या युवा महोत्सवामध्ये सहभागी व पुढे राष्ट्रीय महोत्सवामध्ये सहभागी विद्यार्थी कलाकार आज फिल्म, टेलिफिल्म, टी. व्ही. मालिकेत, व्यावसायिक नाटकांमध्ये काम करत आहेत. याचा आम्हास रास्त अभिमान आहे.

नवनिर्मितीची उत्कट आकांक्षा म्हणजे उन्मेष आणि या आकांक्षेला असणारी विधायक कृतीशिलतेची जोड म्हणजे सृजनता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या सर्व युवा विद्यार्थी व कलावंताच्या सुप्त सृजनशीलतेचे व कलागुणांचे कौतुक व्हावे, म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने '**युवा महोत्सव उन्मेष सृजनरंगाचा**' या रुपाने हा ऑनलॉईन सांस्कृतिक सोहळा आयोजित केला आहे. युवकांच्या अंतरंगातील नव - नव्या कल्पना कृतीतूनच प्रगट होतील, याची आम्हास पूर्ण जाणीव आहे. जगण्यातील आनंद आपल्याला कलेच्या रुपाने मनमुराद घेता यावा म्हणून ही खटाटोप आहे. युवा महोत्सव हा आत्माविष्काराची उधळण करणारा युवकांचा जल्लोष असतो. त्यातून निखळ आनंद लूटण्याची त्यांना संधी मिळते. पण त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी विवेकाचा ध्वज खांद्यावर घ्यावा, मनामध्ये राष्ट्रप्रेमाची भावना असावी, जाती-पातीच्या भेदांना मूठमाती द्यावी, नवसमाजाची निर्मितीची स्वप्ने साकारावीत व उद्याचा भविष्यकाळ उज्ज्वल करण्यासाठी समतेची गीतं गावीत या उद्देशानेच युवा महोत्सवाचे आयोजन केले आहे.

आज विद्यार्थ्यांची जबाबदारी वाढलेली आहे. माणसा-माणसांमधील अंतर वाढत चालले आहे. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटना घडत आहेत. ही प्रवृत्ती कमी करण्यासाठी युवकांनी आपले सर्वस्व समर्पित करण्याची वेळ आली आहे. सांस्कृतिक विचारांमुळे ही प्रवृत्ती नष्ट होण्यास मदत होईल. आपण आपली सांस्कृतिक उंची वाढवून देशाचा भविष्यकाळ उज्ज्वल केला पाहिजे.

युवा महोत्सव म्हणजे संगीत, नृत्य, नाट्य, वाड्मय, ललीत कलेच्या सृजनरंगाचा आविष्कार तर असतोच, पण त्याचबरोबर समाजाला निखळ आनंद द्यावा, ज्वलंत प्रश्नांवर प्रकाश टाकावा, गरिबाचं दुःख वेशीवर टांगून जीवन समृद्ध करण्याचा प्रयत्न करावा हे आपल्या कलेच्या आविष्कारातून सहज शक्य आहे असे मला वाटते.

युवा महोत्सवात उत्साह, संस्कार, शिस्त व चारित्र्य टिकवून ठेवण्यात आपण कमी पडणार नाही याच विश्वासाने व आपला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून युवा महोत्सव यशस्वी होणारच यात शंकाच नाही. सर्व कलाप्रकारांचे नियम सोबत दिले आहेत. आपण सर्व नियमांचे पालन कराल यात शंकाच नाही.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आदरणीय कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या कल्पक व दूरदृष्टीपूर्ण विचारातून कोवीडच्या या थैमानातही विद्यार्थी विकास विभाग तंत्रज्ञानाच्या सहाय्यातून हा गुणदर्शन सोहळा ऑनलाईन आयोजित करतो आहे. माणूस आणि माणूसकी याचे अस्तित्व धोक्यात असतानाही विद्यार्थी विकास विभागाच्या या प्रयत्नांना आपण उत्साहाने साथ द्याल हा आमचा भक्कम विश्वास आहे.

मा. कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव व विद्यापीठ प्रशासनाकडून सर्व युवक - युवती कलावंताना मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा.

संचालक,
विद्यार्थी विकास विभाग
पुअहो सोलापूर विद्यापीठ

कुलसचिव
पुअहो सोलापूर विद्यापीठ

प्र-कुलगुरु
पुअहो सोलापूर विद्यापीठ

मा. कुलगुरु,
पुअहो सोलापूर विद्यापीठ



# संगीत विभाग (Music Events)

## १. शास्त्रीय गायन (Classical Vocal Solo)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) प्रत्येक गायकाला किमान १२ मिनिटे व कमाल १५ मिनिटे वेळ दिला जाईल.
३) प्रत्येक गायकास जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल.
त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
४) या स्पर्धेत फक्त हिंदुस्थानी संगीतातील राग सादर करता येईल.
५) स्पर्धकाने लागणारे साहित्य आपल्या बरोबर आणावे. वाद्यसंगीतामध्ये फक्त पेटी, तबला व तंबोरा किंवा इलेक्टॉनिक साथसंगत ( Track ) याचा वापर करावा.
६) स्पर्धेचा निर्णय रागाची निवड, स्वर, ताल, सादरीकरण आणि एकूण परिणाम यावर अवलंबून राहील.
७) स्पर्धेसाठी इलेक्टॉनिक्स तानपुऱ्याचा वापर करता येईल.
८) वादक साथीदारांची संख्या दोन पेक्षा अधिक असू नये.
९) वादक साथीदार किंवा इलेक्टॉनिक साथसंगत ( Track ) या पैकी एकाच पर्यायाचा वापर स्पर्धकांना करता येईल.

## २. शास्त्रीय सूरवाद्य (Classical Instrumental Solo)

१) सूरवाद्यामध्ये सतार, सरोद, व्हायोलिन, हार्मोनिअम व बासरी इत्यादी वाद्यांचा समावेश आहे.
२) स्पर्धेसाठी प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
३) स्पर्धकांनी त्यांच्याबरोबर स्वत:ची वाद्ये आणावीत.
४) स्पर्धकाने लागणारे साहित्य आपल्या बरोबर आणावे. वाद्यसंगीतामध्ये फक्त पेटी, तबला व तंबोरा किंवा इलेक्टॉनिक साथसंगत ( Track ) याचा वापर करावा.
५) विजेवर चालणारी (सिंथेसायझर, ऑक्टोपॅड) यासारखी वाद्ये स्पर्धेसाठी वापरता येणार नाहीत.
६) स्पर्धकाला किमान १२ मिनिटे व कमाल १५ मिनिटे वेळ दिला जाईल.
७) स्पर्धकास जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल.
त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
८) स्पर्धेचा निर्णय लय, ताल, सुरेलपणा, सादरीकरण इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
९) वादक साथीदारांची संख्या दोन पेक्षा अधिक असू नये.
१०) वादक साथीदार किंवा इलेक्टॉनिक साथसंगत ( Track ) या पैकी एकाच पर्यायाचा वापर स्पर्धकांना करता येईल.

# ३. शास्त्रीय तालवाद्य

(Classical Instrumental Solo (Percussion))

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) प्रत्येक गायकाला किमान १२ मिनिटे व कमाल १५ मिनिटे वेळ दिला जाईल.
३) प्रत्येक गायकास जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.
४) स्पर्धकाने लागणारे साहित्य आपल्या बरोबर आणावे. वाद्यसंगीतामध्ये फक्त पेटी, तबला व तंबोरा किंवा इलेक्टॉनिक साथसंगत ( Track ) याचा वापर करावा.
५) स्पर्धकाने लागणारे साहित्य आपल्या बरोबर आणावे.
६) विजेवर चालणारी (सिंथेसायझर, ऑक्टोपॅड) यासारखी वाद्ये स्पर्धेसाठी वापरता येणार नाहीत.
७) स्पर्धेचा निर्णय ताल, लय, सुरेलपणा व सादरीकरण इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
८) तबला या वाद्याबरोबरच मृदंग, ढोलकी, पखवाज, संबळ, दिमडी या वाद्यांचा समावेश शास्त्रीय तालवाद्य स्पर्धेमध्ये करण्यात आला आहे.
९) वादक साथीदार किंवा इलेक्टॉनिक साथसंगत ( Track ) या पैकी एकाच पर्यायाचा वापर स्पर्धकांना करता येईल.

# ४. सुगम गायन (Light Vocal Solo Indian)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) प्राथमिक तयारीसाठी स्पर्धकास ५ मिनिटे वेळ दिला जाईल.
३) प्रत्येक गायकाला किमान ४ मिनिटे व कमाल ६ मिनिटे वेळ दिला जाईल.
४) प्रत्येक गायकास जास्तीत जास्त १५ सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.
५) स्पर्धकाने लागणारे साहित्य आपल्या बरोबर आणावे. तत्सम
६) स्पर्धकास कोणतेही सूरवाद्य (उदा.- पेटी, व्हायोलिन, मेंडोलिन इ.) व तालवाद्य (उदा.- तबला, बोंगो, ढोलक इ.) आणता येईल.
७) या स्पर्धेत मराठी अथवा हिंदी भाषेतील भावगीत, भक्तीगीत, अभंग किंवा गझल सादर करता येईल.
८) स्पर्धेचा निर्णय गाण्याची निवड, स्वर व सादरीकरण आणि एकूण परिणाम इत्यादी बाबींवर अवलंबून राहील.
९) चित्रपट गीतास परवानगी दिली जाणार नाही.
१०) स्पर्धकाने लागणारे साहित्य आपल्या बरोबर आणावे. वाद्यसंगीतामध्ये सूर वाद्य व ताल वाद्य किंवा इलेक्टॉनिक साथसंगीत ( Track ) याचा वापर करावा.
११) वादक साथीदारांची संख्या दोन पेक्षा अधिक असू नये.
१२) वादक साथीदार किंवा इलेक्टॉनिक साथ संगत ( Track ) यापैकी एकाच पर्यायाचा वापर स्पर्धकांना करता येईल.

# ५. शास्त्रीय नृत्य (Classical Dance)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.

२) शास्त्रीय नृत्यामध्ये खालील नृत्य प्रकारांचा समावेश राहील.
अ) भरतनाट्यम ब) कथ्थक क) कुचिपुडी ड) मणिपुरी.

३) वरीलपैकी एका नृत्याचा आविष्कार स्पर्धकास सादर करता येईल.

४) प्राथमिक तयारीसाठी ५ मिनिटांचा वेळ दिला जाईल.

५) स्पर्धकास सादरीकरणासाठी किमान १२मिनिटे व कमाल १५ मिनिटे वेळ दिला जाईल.

६) जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.

७) साथीदाराऐवजी ध्वनीमुद्रितांचा (कॅसेट,सी.डी.) वापर करता येईल.

८) स्पर्धकांनी जास्तीत -जास्त तीन साथीदार आणावेत.

९) चित्रपटातील शास्त्रीय नृत्ये स्पर्धेत सादर करता येणार नाहीत.

१०) वादक साथीदार किंवा इलेक्टॉनिक साथ संगत ( Track ) यापैकी.एकाच पर्यायाचा वापर स्पर्धकांना करता येईल.

# वाङ्‌मय विभाग (Literary Events)

## ६. वक्तृत्व (मराठी, हिंदी, इंग्रजी) (Elocution)

१) ही स्पर्धा मराठी, हिंदी, इंग्रजी या तीन भाषेत स्वतंत्रपणे आयोजित केली जाईल.

२) स्पर्धेअगोदर घेण्यात येणाऱ्या संघव्यवस्थापकाच्या बैठकीत वक्तृत्वाचे विषय कळविले जातील.

३) महाविद्यालयांना प्रत्येक भाषेतील स्पर्धेसाठी फक्त एकच स्पर्धक पाठविता येईल.

४) प्रत्येक स्पर्धकास किमान ४ मिनिटे व कमाल ५ मिनिटांचा वेळ बोलण्यास दिला जाईल जास्तीत जास्त १५ सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.

५) प्रत्येक भाषेतील स्पर्धा स्वतंत्र असल्याने प्रत्येक भाषेसाठी स्वतंत्र प्रवेशिका पाठवावी.

## ७. वाद - विवाद (Debate)

१) स्पर्धेसाठी विषयाच्या बाजूने व विरूध्द बाजूने बोलणाऱ्या दोन विद्यार्थ्यांचा एक संघ सहभागी असेल.

२) यात भाग घेणारे विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धेसाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांपैकीच असतील.

३) या स्पर्धेत मराठी, हिंदी अथवा इंग्रजी यापैकी कोणत्याही भाषेत बोलता येईल. मात्र तिन्ही भाषेमधून स्वतंत्र क्रमांक असणार नाहीत.

४) ही सांघिक स्पर्धा समजली जाईल

५) प्रत्येक स्पर्धकास किमान ४ मिनिटांचा व कमाल ५ मिनिटांचा वेळ बोलण्यास दिला जाईल.

६) स्पर्धकास जास्तीत जास्त १५ सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास संघ स्पर्धेतून बाद होईल.

७) स्पर्धेचा विषय निश्चित करून तो संघव्यवस्थापकाच्या बैठकीत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

# नाट्य विभाग (Theater Events)

## ८. नकला (Mimicry)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.

२) स्पर्धकास सादरीकरणासाठी किमान ४ मिनिटे व कमाल ५ मिनिटे वेळ दिला जाईल.

३) जास्तीत जास्त ३० सेकंद अधिकचा वेळ मान्य करण्यात येईल. त्यापेक्षा अधिक वेळ झाल्यास स्पर्धक स्पर्धेतून बाद होईल.

४) स्पर्धकास विविध आवाजाची व प्रसिध्द व्यक्तींच्या भाषणाची नक्कल करता येईल. यामध्ये चित्रपट सृष्टीतील व्यक्तिमत्वाचा ही समावेश असेल.

५) स्पर्धेचे मूल्यमापन नक्कल कौशल्य, आवाजाची विविधता, शब्दोच्चाराचे अनुकरण व सादरीकरण यावर अवलंबून राहील.

६) या कलाप्रकारात आपले सादरीकरण करत असताना मांडल्या जाणाऱ्या संवाद अथवा उद्‌गाराद्वारे कोणतेही अश्लिल, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय तेढ निर्माण होईल असे सादरीकरण टाळावे.

# ललितकला विभाग (Fine Arts)

## ९. स्थळचित्रण (On the Spot Painting)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) आपल्या घराजवळच्या सुरक्षित परिसराचे चित्रण स्पर्धकांने करावयाचे आहे.
३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.
४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.
५) चित्राचा आकार २२'' बाय १५'' असेल. स्पर्धकांने दर्जेदार कागदाचा वापर करावा.
६) चित्रणासाठी कोणत्याही प्रकारचे (ऑईल, वॉटर, पेस्टल इत्यादी) रंग वापरता येतील.
७) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी (कागदासह) स्वत: आणावे.

## १०. व्यंग चित्रण (Cartooning)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) व्यंगचित्रणासाठी विषय आयत्या वेळी देण्यात येईल.
३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.
४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.
५) चित्राचा आकार २२''बाय १५'' असेल. स्पर्धकांने दर्जेदार कागदाचा वापर करावा.
६) चित्रणासाठी कोणत्याही प्रकारचे (ऑईल, वॉटर, पेस्टल इत्यादी) रंग वापरता येईल.
७) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी (कागदासह) स्वत: आणावे.

## ११. भित्तीचित्रण (Poster Making)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) भित्तीचित्रणासाठी विषय आयत्या वेळी देण्यात येईल.
३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.
४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.
५) चित्रणासाठी कोणत्याही प्रकारचे (ऑईल, वॉटर, पेस्टल इत्यादी) रंग वापरता येतील.
६) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी (कागदासह) स्वत: आणावे.
स्पर्धकांने दर्जेदार कागदाचा वापर करावा.

## १२. कातरकाम (Collage)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) स्पर्धेच्या ठिकाणीच कातरकाम कलाकृतीची निर्मिती करावयाची आहे.
३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.
४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.
५) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी (कागदासह) स्वत: आणावे.

## १३. मातीकाम (Clay Modelling)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) स्पर्धेचा विषय आयत्या वेळी देण्यात येईल.
३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.
४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.
५) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वत: आणावे.
६) स्पर्धकांना बॉम्बे क्ले (माती) अथवा उपलब्ध मातीचा वापर करता येईल.

## १४. रांगोळी (Rangoli)

१) प्रत्येक महाविद्यालयातून फक्त एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२) स्पर्धेचा विषय आयत्या वेळी देण्यात येईल.
३) स्पर्धेसाठी किमान दोन तास व कमाल अडीच तास वेळ दिला जाईल.
४) या कलाप्रकारासाठी वाढीव वेळेची तरतूद नाही.
५) स्पर्धेतील रांगोळीची दृष्यरचना मुक्तहस्त, वर्णनात्मक व हेतू व्यक्त करणारी असावी.
६) चित्रणासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वत: आणावे.
७) दोन फूट बाय दोन फूट चौकोनी जागेत स्पर्धकांनी रांगोळी काढावी.

# महत्वाचे नियम

## ❊ प्रवेश शुल्क

युवा महोत्सवामध्ये भाग घेण्याकरिता विद्यापीठाने खालीलप्रमाणे शुल्क ठरविले आहे.

१) प्रत्येक सांघिक स्पर्धेकरिता - रू. १००/-

२) प्रत्येक वैयक्तिक स्पर्धेकरिता - रू. ५०/-

स्पर्धक महाविद्यालयाने आपण भाग घेतलेल्या एकूण स्पर्धेच्या संख्येच्या प्रमाणात प्रत्येक सांघिक / वैयक्तिक स्पर्धेप्रमाणे आवश्यक त्या शुल्काची रक्कम मा. वित्त अधिकारी, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या नावे डिमांड ड्राफ्टने (डी.डी.) पाठवावे. अथवा विद्यापीठाच्या कार्यालयात नगदी भरणा करावा. प्रवेश शुल्काचा भरणा विद्यापीठाच्या कार्यालयात केल्याशिवाय प्रवेश अर्ज स्विकारण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

## ❊ संघव्यवस्थापक

प्रत्येक महाविद्यालयाच्या संघाबरोबर एक प्राध्यापक/प्राध्यापिका व १० विद्यार्थी संख्येच्या पुढे दोन संघ व्यवस्थापक मान्य केले जातील. संघ व्यवस्थापकांने आपल्या स्पर्धकाचे ऑनलाईन स्पर्धेत वेळेत व शिस्तीत सादरीकरण व्हावे दक्षता घ्यावी.

## ❊ स्पर्धकांची पात्रता

पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठातील सर्व संलग्न महाविद्यालये / संस्था तसेच सर्व प्रमाणित पदव्युत्तर वर्गात पूर्णवेळ शिकत असणाऱ्या व कमीत कमी एक वर्ष मुदतीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना युवा महोत्सव स्पर्धेमध्ये भाग घेता येईल. प्रोव्हिजनल ॲडमिशन मान्य केले जाणार नाही.

स्पर्धकाचे वय स्पर्धेच्या तारखेस २५ वर्षापेक्षा कमी असावे. वय २५ वर्षे पूर्ण असल्यास स्पर्धक अपात्र ठरेल. सहभागी होणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीने विद्यापीठात / महाविद्यालयात प्रवेश घेऊन सात वर्षापेक्षा अधिक काल उलटून गेला असल्यास असा विद्यार्थी/विद्यार्थीनी भाग घेऊ शकणार नाही. तथापि कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील सर्व शाखेच्या अंतिम वर्षातील अथवा २५ वर्षापेक्षा कमी वयाच्या विद्यार्थ्यास सहभागी होता येईल. संघव्यवस्थापकाने स्पर्धकांचे वयाचे पुरावे मुळ पत्र नोंदणीवेळी आणने आवश्यक आहे. ( S.S.C. बोर्डस् सर्टिफिकेट) हे मागणीनुसार सादर करणे आवश्यक आहे.

## ❊ संघाची क्षमता

१) संघातील एकुण स्पर्धकांची संख्या ही सहभागी विद्यार्थी स्पर्धक २ संघव्यवस्थापक व व्यावसायिक वादक यांच्या एकुण बेरजेसह कमाल २५ इतकी असणे बंधनकारक राहील.

## ❊ साहित्य •••

प्रत्येक स्पर्धेत भाग घेण्यासाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी आपल्या बरोबर आणावे. संयोजकाकडून कोणतेही साहित्य पुरविले जाणार नाही.

**❊ सादरीकरणाच्या वेळेची नोंद**

सहभागी महाविद्यालयातील संघप्रमुखांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचे प्रत्येक कलाप्रकाराचे सादरीकरण करण्यापूर्वी ५ मिनिटे अगोदर ऑनलॉईन प्लॅटफॉर्मवर वेटींग रुम मध्ये उपस्थित राहणे बंधनकारक आहे. संघप्रमुखाने सादरीकरणाच्या प्रारंभीची व समाप्तीच्या वेळेची नोंद घेऊन त्याला मान्यता देणे आवश्यक आहे.

**❊ सादरीकरण**

सर्व वैयक्तिक स्पर्धा प्रकारांमध्ये किमान ५ संघाच्या सादरीकरणाशिवाय ती स्पर्धा ग्राह्य धरुन गुणानुक्रम काढण्यात येणार नाही. मात्र किमान तीन संघांचे सादरीकरण झाल्यास केवळ एका क्रमांकाचा पुरस्कार दिला जाईल.

**❊ तक्रार निवारण**

स्पर्धक कलाकारांनी आपल्या तक्रारी संबंधित व्यवस्थापक प्राध्यापकांमार्फत युवा महोत्सव समितीकडे रु. १०००/- तक्रार निवारण शुल्क भरुन लेखी सादर कराव्यात. सदर शुल्काचा परतावा होणार नाही. तक्रारी संदर्भात विद्यापीठ युवा महोत्सव आयोजन समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल. तक्रार अर्जाचा नमुना सोबत जोडलेला आहे.

**❊ विद्यापीठ युवा महोत्सव संघ**

युवा महोत्सवाकरिता विद्यापीठ संघ निवडीचे सर्व अधिकार विद्यापीठ युवा महोत्सव समितीकडे असतील. विद्यापीठ संघ निवडताना महाविद्यालयाचा विजेता संघ आहे तसा निवडला जाणार नाही. परीक्षक मंडळाच्या शिफारशी नुसार विद्यापीठ संघाची निवड करण्यात येईल.

## ⁂ स्पर्धेसंबंधीचे इतर नियम

१) प्रत्येक विद्यार्थी कलाकाराने सोबतच्या नमुन्यातील ओळखपत्र सतत जवळ बाळगले पाहिजे. ओळखपत्र दाखविल्याशिवाय स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

२) स्पर्धा सुरू होण्यापूर्वी नियोजित स्थळी स्पर्धकांनी १० मिनिटे अगोदर उपस्थित रहावे.

३) स्पर्धकांना लॉटमध्ये जाहीर झालेल्या क्रमांकानेच भाग घेता येईल ऐनवेळी यामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही. अपरिहार्य परिस्थितीमध्ये यात योग्य ते बदल करण्याचे अधिकार संयोजन समितीने राखून ठेवले आहेत.

४) संगीत, नृत्य, नाट्य या सर्व स्पर्धेतील सहभागी वैयक्तिक स्पर्धेतील एकूण साथीदारांची संख्या ७ पेक्षा अधिक असू नये याची नोंद घ्यावी.

५) व्यावसायिक साथीदारांची संख्या ३ पेक्षा अधिक असू नये. व्यावसायिक साथीदारांची नोंद 'विद्यार्थी' असा करू नये. तसे आढळल्यास ते गैरशिस्तीचे वर्तन मानले जाईल. इयत्ता ११ वी व १२वी मधील विद्यार्थी साथीदार हा व्यावसायिक साथीदार मानला जाईल.

६) कोणत्याही वादग्रस्त विषयाबाबत कोणत्याही प्रसार माध्यमाकडे जाता येणार नाही. ते गैरशिस्तीचे वर्तन मानण्यात येईल.

७) परीक्षक मंडळानी घेतलेले निर्णय अंतिम व बंधनकारक असतील.

८) युवा महोत्सवामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थी कलाकारांनी आपल्या जन्म तारखेची नोंद असलेली माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची किंवा एस.एस. सी. बोर्ड सर्टिफिकेटची सत्यप्रत प्रवेशिकेसोबत जोडणे बंधनकारक आहे.

संचालक,<br>
विद्यार्थी विकास विभाग

परिशिष्ट - अ

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

## विद्यार्थी विकास विभाग

## ऑनलाईन युवा महोत्सव

### सहभाग निश्चिती व विवरण पत्र

नमुना फॉर्म

प्रति,
मा. संचालक,
विद्यार्थी विकास विभाग,
पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

विषय :- युवा महोत्सव सहभाग निश्चितीबाबत.

महोदय,

विद्यापीठस्तरीय युवा महोत्सवामध्ये आमच्या महाविद्यालयाचा सहभाग निश्चित आहे. त्यामुळे आमच्या महाविद्यालयाच्या युवा महोत्सव संघाचे पूर्ण विवरण पुढीलप्रमाणे देत आहोत.

१) महाविद्यालयाचे नांव : ______________________

२) संघ व्यवस्थापकाचे नांव : ______________________

पत्ता : ______________________

दूरध्वनी क्र.: ______________ भ्रमणध्वनी क्र.: ______________

३) सहभागी कलाकारांची एकूण संख्या : ______________

पुरूष : ______________

स्त्री : ______________

४) साथीदारांची एकूण संख्या : ______________

पुरूष : ______________

स्त्री : ______________

५) संघव्यवस्थापक /एकूण संख्या : ______________

पुरूष : ______________

महिला : ______________

६) महाविद्यालय संघातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या : पुरुष ________ महिला ________

दिनांक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्राचार्य

(कृपया वरील तपशील त्वरीत पाठवावा.)

परिशिष्ट – ब

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

विद्यार्थी विकास विभाग

## ऑनलाईन युवा महोत्सव

**नमुना प्रवेश पत्रक**

### मुख्य स्पर्धा प्रकाराचे नांव : संगीत/नृत्य/नाट्य/वाड्.मय/ललित कला

| अ. क्र. | कलाकार/ साथीदार यांचे नांव (आडनाव प्रथम लिहावे) | स्त्री/पुरूष | शिकत असलेला वर्ग | जन्म तारीख | सहभागी होणाऱ्या स्पर्धेचे नांव (फक्त जो विद्यार्थी कलाकार आहे त्याच्या नावापुढे लिहावीत.) | येथे फक्त साथीदारांचा विद्यार्थी, साथीदार किंवा धंदेवाईक साथीदार असा स्पष्ट उल्लेख करावा. | राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी होता काय ! केंव्हा ! | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

सांस्कृतिक विभाग प्रमुख

प्राचार्यांची स्वाक्षरी व शिक्का

परिशिष्ट - क

# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

## ONLINE YOUTH FESTIVAL

Identity Certificate for Participants/ Accompanist
(Strikeout which is not applicable)

Participating College, ______________________________

______________________________

(A) 1. Name of Participant Student ______________________________
(In block letters)

2. Mother's Name ______________________________
(In block letters)

3. Date of Birth ______________________________

4. Class ______________________________

5. Item of participation ______________________________

6. Year of passing 12th of equvalent diploma ______________________________

(B) Accompanist's Name ______________________________

I. Professional/Student ______________________________

II. Standard (if student) ______________________________

(C) Address ______________________________

______________________________

Signature of Student
(Participant/ Accompanist)

Certified that particular given above are correct to the best of my knowkedge and belief.

| Date: | Signature of Cultural Officer | Signature of the Principal with Seal |
|---|---|---|

**Note:** 1. The participating student shall carry this identity certificate with him/her and shall produced it as and when neccessary for identification falling which he/she shall not beallowed to participate in the youth festival competition
2. Submit Xerox copy of the identity certificate at the of Registration.

परिशिष्ट - ड

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग
## ऑनलाईन युवा महोत्सव

### स्पर्धा निहाय कलाकार, साथीदार व वेळेचे विवरण

| अ. क्र. | स्पर्धा | सहभागी कलाकारांची संख्या | | | वेळ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कलाकार | साथीदार | एकूण | किमान | कमाल | अधिकचा |
| | **संगीत** | | | | | | |
| १) | शास्त्रीय गायन | १ | २ | ३ | १२ मि. | १५ मि. | ३० सेकंद |
| २) | शास्त्रीय सूरवाद्य | १ | २ | ३ | १२ मि. | १५ मि. | ३० सेकंद |
| ३) | शास्त्रीय तालवाद्य | १ | २ | ३ | १२ मि. | १५ मि. | ३० सेकंद |
| ४) | सुगम गायन | १ | २ | ३ | ४ मि. | ६ मि. | १५ सेकंद |
| | **नृत्य** | | | | | | |
| १) | शास्त्रीय नृत्य | १ | ३ | ४ | १२ मि. | १५ मि. | ३० सेकंद |
| | **वाङ्.मय** | | | | | | |
| १) | वक्तृत्व (मराठी, हिंदी, इंग्रजी) | १ | - | १ | ४ मि. | ५ मि. | १५ सेकंद |
| २) | वाद विवाद | २ | - | २ | ४ मि. | ५ मि. | १५ सेकंद |
| | **नाट्य** | | | | | | |
| १) | नकला | १ | - | १ | ४ मि. | ५ मि. | १५ सेकंद |
| | **ललित कला** | | | | | | |
| १) | स्थळ चित्रण | १ | - | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| २) | भित्ती चित्रण | १ | - | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| ३) | व्यंग्य चित्रण | १ | - | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| ४) | माती काम | १ | - | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| ५) | कातरकाम | १ | - | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |
| ६) | रांगोळी | १ | - | १ | २ तास | २.३० मि. | तरतूद नाही |

परिशिष्ट - इ

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

## विद्यार्थी विकास विभाग

# ऑनलाईन युवा महोत्सव

## तक्रार निवारण अर्ज

नमुना फॉर्म

प्रति,
मा. संचालक,
विद्यार्थी विकास विभाग,
पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

विषय : तक्रार निवारण अर्ज

महोदय,
______________________________
______________________________
______________________________
______________________________

(तक्रारीचा तपशील)

आपला विश्वासू
(संघ प्रमुखाचे नांव व स्वाक्षरी)
फोन नं.
(महाविद्यालयाचे नांव)

(कृपया वरील तपशील त्वरीत पाठवावा.)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

## विद्यार्थी विकास मंडळ

| | |
|---|---|
| डॉ. मृणालिनी फडणवीस<br>(मा. कुलगुरू, पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर) | अध्यक्ष |
| डॉ. देवेंद्रनाथ मिश्रा<br>(मा. प्र-कुलगुरू, पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर) | सदस्य |
| डॉ. शोभा बोल्ली<br>(सोलापूर) | सदस्य |
| डॉ. अश्विनी वळसंगकर<br>(सोलापूर) | सदस्य |
| डॉ. प्रभाकर कोळेकर<br>( पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर) | सदस्य |
| डॉ. अनुराधा क्षिरसागर<br>(वसुधरा कला महाविद्यालय, बार्शी ) | महिला सदस्य |
| अध्यक्ष, विद्यार्थी परिषद | सदस्य |
| प्रा. यशपाल खेडकर<br>स्वेरीज अभियांत्रिकी महाविद्यालय, गोपाळपूर. | सदस्य |
| डॉ. गुणवंत सरवदे<br>संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, पुअहो सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | सदस्य |
| प्रा. डॉ. वसंत कोरे<br>(संचालक, विद्यार्थी विकास विभाग) | सदस्य सचिव |

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग
## ऑनलाईन युवा महोत्सव

### युवा महोत्सव संयोजन समिती

| | |
|---|---|
| डॉ. मृणालिनी फडणवीस<br>(मा. कुलगुरू, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ) | अध्यक्ष |
| प्रा. डॉ. देवेंद्रनाथ मिश्रा<br>(प्र-कुलगुरू, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ) | सदस्य |
| प्रा. डॉ. व्ही. बी. घुटे<br>(प्र. कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ) | सदस्य |
| सीए. श्रेणीक शहा<br>(वित्त व लेखा अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ) | सदस्य |
| डॉ. विकास कदम<br>(अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा तथा प्र.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ) | सदस्य |
| डॉ. एस. के. पवार<br>(संचालक, क्रीडा विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ) | सदस्य |
| डॉ. गुणवंत सरवदे<br>(संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ) | सदस्य |
| डॉ. प्रभाकर कोळेकर<br>(संचालक, भाषा संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ) | सदस्य |
| प्रा. राम पवार (सांगोला महाविद्यालय, सांगोला) | सदस्य |
| डॉ. डी. जी. शिंदे (देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ) | सदस्य |
| प्रा. यशपाल खेडकर (अभियांत्रिकी महाविद्यालय, पंढरपूर) | सदस्य |
| प्रा. जवाहर एल. मोरे (संतोष भीमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप) | सदस्य |
| प्रा. संगीता भोसले (वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर) | सदस्य |
| डॉ. विरभद्र दंडे (डी. बी. एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर) | सदस्य |
| डॉ. माया पाटील (संचालिका, ललित कला व कला संकुल, पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ) | सदस्य |
| डॉ. एस. डी. राऊत (संगणकशास्त्र संकुल, पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ) | सदस्य |
| श्री. पुष्कराज गोरंटला (सोलापूर) | सदस्य |
| डॉ. अभिजित जगताप (वैद्यकीय अधिकारी, पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ) | सदस्य |
| प्रा. डॉ. वसंत कोरे (संचालक, विद्यार्थी विकास विभाग) | सदस्य सचिव |

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)

